मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# फडणवीसांची गटनेतेपदी निवड, कार्यकर्त्यांचा जल्लोष

## देवेंद्र फडणवीस यांची विधिमंडळ नेतेपदी निवड : पिंपरी-चिंचवडमध्ये आनंदोत्सव साजरा

**पिंपरी | प्रतिनिधी**

भाजपाच्या विधिमंडळ नेतेपदी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्याबद्दल पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) भाजपतर्फे आज, बुधवारी भाजप पदाधिकाऱ्यांनी फटाक्यांची आतषबाजी करीत पेढे वाटून जल्लोष साजरा केला. चाफेकर चौक - चिंचवड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी आणि भोसरी या तिन्ही विधानसभा परिसरात शहराध्यक्ष तथा आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकाऱ्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून पेढे वाटून जल्लोष साजरा केला.



यावेळी भाजपा कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश सदस्य महेश कुलकर्णी सरचिटणीस नामदेव ढाके, संजय मंगोडेकर, सरचिटणीस अजय पाताडे, वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळुराम बारणे, प्रदेश युवा मोर्चा चिटणीस तुषार हिंगे, युवा मोर्चा प्रदेश सदस्य अजित कुलथे मंडल अध्यक्ष राजेंद्र बाबर, सोमनाथ भोंडवे, माजी महापौर आर. एस. कुमार, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, माजी नगरसेवक राजेंद्र गावडे, नगरसेविका अनुराधा गोरखे, योगेश चिंचवडे, उपाध्यक्ष कैलास सानप, मधुकर बच्चे, नेताजी शिंदे, गणेश ढाकणे, नंदू कदम, विशाल वाळुंजकर, निलेश अष्टेकर, देवदत्त लांडे, डॉ. तृप्ती देसाई, विजय शिनकर, गणेश वाळुंजकर, सलीम शिकलगार, शितल कुंभार यांच्यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांची विधीमंडळाचा नेता म्हणून निवड करण्यात आली. त्यामुळे फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. याचा आनंद भाजप कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी जल्लोष करून आजच साजरा केला आहे. उद्या 5 डिसेंबर रोजी फडणवीस यांचा आझाद मैदानावर ग्रँड शपथविधी सोहळा होणार आहे. मुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीनंतर राज्याचे 21 वे मुख्यमंत्री म्हणून फडणवीस राज्याचा कारभार सांभाळतील. याचा मनस्वी आनंद शहरातील सर्व कार्यकर्त्यांना होत आहे.

### महेश लांडगे म्हणतात... अभिनंदन बॉस..!

» आधुनिक महाराष्ट्राचे नेते तथा माझे मार्गदर्शक मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांची भारतीय जनता पार्टीच्या गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र बलशाली होईल आणि राष्ट्र उभारणीच्या कार्यात महत्वपूर्ण योगदान देईल, असा विश्वास वाटतो, अशा शब्दांत पिंपरी-चिंचवड भाजपाचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी भावना व्यक्त केल्या आहेत.

# पार्किंगचे नियम पाळा टोइंगची कारवाई टाळा

## वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने पोलिस आयुक्तालयांतर्गत टोइंग व्हॅन प्रकल्प कार्यान्वित

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात काही नागरिक आपले वाहन अस्ताव्यस्तपणे तसेच बेकायदेशीररीत्या जागा मिळेल त्या ठिकाणी पार्क करीत असतात. यामुळे वाहतूक कोंडीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. ही कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत टोइंग व्हॅन प्रकल्प कार्यान्वित केला आहे. या अंतर्गत वाहतुकीस अडथळा ठरतील अशी वाहने दंड आकारून टोइंग करण्याबाबतची कारवाई केली जाणार आहे. या कारवाईसाठी एकूण २५ वाहने वापरण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात एकूण आठ वाहने वापरण्यात येणार आहेत. नंतर टप्प्याटप्प्याने व आवश्यकतेनुसार वाहनांची संख्या वाढवण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत चाकण, भोसरी, तळेगाव हे औद्योगिक क्षेत्र तसेच हिंजवडी, तळवडे हे आयटी पार्क असून देहू व आळंदी तीर्थक्षेत्रे आहेत. यांसह मोठ्या बाजारपेठा तसेच शैक्षणिक व व्यापारी संकुले आहेत. यामुळे शहरातील रस्त्यांवर वाहनांची वर्दळ असते.



दुचाकी तसेच चारचाकी वाहनांचा वापर करणाऱ्या नागरिकांची संख्याही मोठ्या प्रमाणात असून, अनेकजण दुचाकी व चारचाकी वाहनांचा वापर करीत असतात. मात्र, काहीजण पार्किंगचे नियम न पाळता बेशिस्तरित्या कुठेही वाहन पार्क करतात. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. अशा वाहनांवर पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाकडून कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. रस्त्यावर कुठेही बेशिस्तरीत्या उभी केलेली वाहने टोइंग केली जाणार असून, दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तरी नागरिकांनी आपली वाहने बेकायदेशीररीत्या व वाहतुकीस अडथळा ठरतील, अशाप्रकारे न लावता योग्यरीत्या उभी करावीत, असे आवाहन वाहतूक शाखेकडून करण्यात आले आहे.

### अशी असेल कारवाई

» दुचाकी वाहन टोइंग केल्यास त्या वाहनाला ५०० रुपये दंड व २०० रुपये टोइंग चार्ज आकारण्यात येणार असून, ३६ रुपये जीएसटी असा एकूण ७३६ रुपये दंड आकारण्यात येणार आहे.

» चारचाकी वाहनाला ५०० रुपये दंड व ४०० रुपये टोइंग चार्ज आकारण्यात येणार असून, ७२ रुपये जीएसटी असा एकूण ९७२ रुपये दंड आकारण्यात येणार आहे.

» टोइंग कारवाई केलेल्या वाहनांवर पूर्वीचा दंड प्रलंबित असल्यास प्रलंबित दंडापैकी किमान एक दंड टोइंगच्या दंडासोबत भरणे बंधनकारक आहे.

# दाट धुक्यातही रेल्वे धावणार सुसाट

## पुणे रेल्वे विभागात 80 फॉग पास डिव्हाईस, त्यामुळे धुक्यातही रेल्वेगाड्या सुरळीत धावणार

**पुणे | प्रतिनिधी**

हिवाळ्यात पडणाऱ्या दाट धुक्यामुळे रेल्वेच्या वेगावर मर्यादा येतो. वेगमर्यादा कमी झाल्यामुळे रेल्वेच्या नियोजित वेळेवर परिणाम होतो. काही वेळा गाड्या उशिरा धावतात. मात्र, नवीन धुके सुरक्षा उपकरणाद्वारे (फॉग पास डिव्हाइस) हा अडथळा दूर होणार असून, कमी दृश्यमानता असली, तरी लोकोपायलटला साधारण ५०० मीटरपर्यंतची सिग्नलची स्थिती समजणार आहे. पुणे विभागातील ८० इंजिनमध्ये फॉग पास डिव्हाईस उपकरणे बसवले आहेत. त्यामुळे धुक्यातही रेल्वेगाड्या सुरळीत धावतील.

रेल्वेच्या लांब पल्ल्याच्या गाड्यांना हिवाळ्यात अनेक वेळा धुक्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते. दाट धुक्याचा थेट गाड्यांच्या वेगावर परिणाम होतो. त्यामुळे गाड्यांना अनेक तास उशीर होतो. त्यामुळे मध्य रेल्वे विभागाकडून पुणे विभागाला फॉग पास डिव्हाईसच्या ८० उपकरणे दिली आहेत. त्यामुळे कमी दृश्यमानता असली तरी लोकोपायलटला साधारण पाचशे मीटरपर्यंतची सिग्नलची स्थिती समजणार आहे. हिवाळ्यात पडणाऱ्या दाट धुक्यामुळे अनेक वेळा रेल्वे गाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होते. परिणामी गाड्यांचा वेग कमी करावा लागतो. पण, त्यासाठी रेल्वेकडून फॉग पास डिव्हाईस हे उपकरण तयार करण्यात आले आहे. ते प्रत्येक रेल्वे विभागाला देण्यात आले आहे. धुक्याच्या वेळी हे उपकरण रेल्वे इंजिनमध्ये ठेवण्यात येते. हे उपकरण 'जीपीएस' प्रणालीनुसार चालते. धुक्यात चालकांना सिग्नल दिसण्यात या उपकरणामुळे मदत होते. कर्मचारी असलेली आणि नसलेली रेल्वेची फाटके, वेगावर कायमस्वरूपी निर्बंध असलेले विभाग आदींबाबतची माहितीही रेल्वे चालकांना ५०० मीटर आधी उपकरणावर दिसते. त्यामुळे गाडीच्या वेगाबाबत विचार करता येतो. उत्तर भारतामध्ये हिवाळ्यात मोठ्या प्रमाणात दाट धुके पडते. त्यामुळे त्या गाड्यांच्या वेळापत्रकावर जास्त परिणाम होते. त्यामुळे या गाड्यांमध्ये प्रामुख्याने हे उपकरण बसविण्यात आले आहे. त्याचा फायदा प्रवाशांना होत आहे. तसेच, सुरक्षेबाबतीत देखील हे उपकरण फायद्याचे ठरत आहे.



> हिवाळ्यात दाट धुक्यामुळे रेल्वे गाड्यांचा वेग कमी करावा लागतो. धुके सुरक्षा उपकरणांमुळे जीपीएसद्वारे सिग्नल, लेव्हल क्रॉसिंगची माहिती लोको पायलटला मिळणार आहे. त्यामुळे सुरक्षित आणि वेगवान प्रवास होणार आहे. सध्या पुणे विभागात ८० इंजिनमध्ये बसविण्यात आले आहे.
>
> - रामपाल बडपग्गा, जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे.

### धुके सुरक्षा उपकरणाचा असा होतो उपयोग

'जीपीएस' तंत्रज्ञानामुळे रेल्वे ट्रॅक नकाशा, सिग्नल, स्थानके आणि रेल्वे क्रॉसिंगची माहिती मिळू शकते. गाडी धावताना लोको पायलटला लेव्हल क्रॉसिंग आणि सिग्नल्सची माहिती देत असते. गाडी चालविताना जेव्हा लोको पायलटला या यंत्रावरून ट्रॅकवर कोणतीही समस्या आहे की नाही, त्यानुसार गाडी नियंत्रित करू शकतो किंवा वेग वाढवू शकतो. हे उपकरण 'जीपीएस' तंत्रज्ञानावर चालते, त्यामुळे लोको पायलट पुढील तीन सिग्नल्सबाबत ऑडिओ आणि व्हिज्युअल संकेतांद्वारे सूचना देते. फॉग डिव्हाइस उपकरण आकाराने लहान असून, उपकरणाचे वजन फक्त दीड किलो. गाडीचा वेग ताशी १४० ते १६० किलोमीटर असला तरी यंत्रणा सुरळीत. मेल, एक्स्प्रेस, सुपरफास्टसह डेमू, मेमू, ईएमयू आदी गाड्यांमध्ये चालते.

# कात्रज चौकाची 'कोंडी'..वाहतुकीचा बोजवारा

## महानगरपालिका स्थायी समितीची मंजुरी : आमदार लांडगे, माजी नगरसेवक भालेकर यांचा पाठपुरावा

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज चौकातील उड्डाणपुलाच्या कामानिमित्त मंगळवारपासून वाहतुकीत बदल करण्यात आल्याने पहिल्याच दिवशी वाहतुकीचा बोजवारा उडाल्याचे दिसून आले. दररोजच्या मार्गावरून जाणाऱ्या प्रवाशांना पर्यायी मार्गाद्वारे जावे लागल्याने प्रवाशांमध्ये गोंधळ उडाल्याचे चित्र होते. कात्रज बोगद्याकडून येणारी आणि साताऱ्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर जड वाहनांच्या दूरपर्यंत रांगा लागल्याने सकाळच्या वेळेत कामावर जाणारे वाहनचालक, रिक्षाचालक, तसेच शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी वाहने कोंडीत बराच काळ अडकून पडल्याने त्यांना मनस्ताप सहन करावा लागला.

कात्रज चौकातील उड्डाणपुलाचे (सेटमेंटल लॉन्चिंग) काम करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे. जड वाहनांसाठी पर्यायी मार्गाची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, तशा आशयाचे फलक नसल्याने चालकांनी चौकातून प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वाहनधारकांचा गोंधळ झाला होता. सातारा, सांगली, कोल्हापूर येथून कात्रज बोगद्यामार्गे येणाऱ्या जड वाहनांच्या रांगा लागल्याने ही वाहतूक वळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात वाहतूक पोलिसांचा फौजफाटा तैनात होता. पोलिसांनी टप्प्याटप्प्याने वळविलेल्या मार्गावरून जड वाहने मार्गस्थ केली असली, तरी इतर वाहतुकीवर परिणाम झाला.

मंतरवाडी, उंड्री, पिसोळी, मार्केट यार्ड, गंगाधाम, हडपसर मंतरवाडीमार्गे कात्रज चौकाकडे येणाऱ्या-जाणाऱ्या मार्गावरही वाहतुकीची कोंडी झाली.दरम्यान, वाहतुकीत बदल केल्याने पहिल्या दिवशी अवजड वाहनचालकांना त्रासाला सामोरे जावे लागले आहे. मात्र, याबाबत वाहतूक पोलीस, परिवहन विभाग आणि एसटी महामंडळाने पुन्हा एकदा सूचना देऊन पर्यायी मार्गाचा अवलंब करावा, असे निर्देश दिले आहेत.



### विधानसभा निवडणुकीचेही कारण

» राज्यामध्ये 15 ऑक्टोबरपासून विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता सुरु झाली. 20 नोव्हेंबरला मतदान तर, 23 नोव्हेंबरला मतमोजणी झाली. म्हणजे जवळपास निवडणुकांमध्ये सव्वा महिन्यांचा कालावधी गेला. निवडणुकांसाठी पीएमआरडीएचे अधिकारी नियुक्त करण्यात आलेले होते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती आदेश मागे घेतल्यानंतरही पीएमआरडीएकडून अनधिकृत बांधकामांवर कारवाई होऊ शकलेली नाही.

> सांगली, सातारा, कोल्हापूरवरून कात्रज चौकात येणाऱ्या एसटी बसला बंदी असणार आहे. या बस नव्या बोगद्यातून नवले पूल, पासलकर चौक पूलमार्गे सिंहगड रस्त्याने स्वारगेटसाठी शहरात प्रवेश करतील.
>
> - प्रमोद नेहुल, विभाग नियंत्रक, पुणे विभाग एसटी महामंडळ.

# ‘जीआयएस’ प्रणालीद्वारे होणार रस्त्यांची देखभाल

## तीन लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या व्यावसायिक, औद्योगिक, निवासी मालमत्ता महापालिकेच्या रडारवर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून शहरातील रस्त्यांची देखभाल आणि व्यवस्थापन प्रक्रिया सुधारण्यासाठी भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) आधारित रस्ता मालमत्ता व्यवस्थापन प्रणाली (RAMS) विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून केंद्रिकृत डेटाची अनुपस्थिती, संसाधनांचे अकार्यक्षम वाटप आणि रस्तादुरुस्तीबाबतचे निर्णय यासारख्या अनेक वर्षांपासून शहरी रस्ते व्यवस्थापनामध्ये भेडसावणाऱ्या गंभीर आव्हानांना प्रणालीद्वारे मार्ग काढण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यांच्या मालमत्तेबाबतची एकत्रित माहिती नसणे ही महत्त्वपूर्ण समस्या आहे. माहितीच्या अभावामुळे नियोजनामध्ये कमतरता निर्माण होताता. रस्त्याबाबत माहिती मिळविण्यासाठी कोणतीही रस्ता



ओळख प्रणाली नसल्याने पायाभूत सुविधांचा मागोवा घेणे व त्यांचे व्यवस्थापन करणे आव्हानात्मक बनले आहे. रस्त्यांची देखभाल करण्यासाठी वेगवेगळ्या मागण्या आल्याने त्यासाठी लागणाऱ्या संसाधनांचे असमान वितरण होते. यामुळे शहरातील काही भागात रस्तादेखभालीचे सुव्यवस्थित काम सुरू असताना काही भाग दुर्लक्षित राहत आहे. अनावश्यक खर्च व दुय्यम सेवा मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे.

**‘अशी’ आहेत रस्ता मालमत्ता व्यवस्थापन प्रणालीची वैशिष्ट्ये :**

सर्वसमावेशक माहितीचे संकलन : GPS – सक्षम वाहनांवर आणि उच्च-रिझोल्यूशन कॅमेरे वापरून रस्त्यांची यादी, स्थितीचे मूल्यांकन आणि मालमत्तेचे मॅपिंग करण्यात येणार आहे.

वैज्ञानिक अंदाजपत्रक : संसाधनांचा कार्यक्षम वापर करण्यासाठी मोजमाप करण्यायोग्य निकषांवर देखरेखीच्या कामांचे नियोजन करण्यात येणार आहे.

प्रतिबंधात्मक देखभाल : रस्ते दीर्घकाल टिकण्यासाठी व त्यावर होणारा दीर्घकालीन खर्च कमी करण्यासाठी सध्या भेडसावणाऱ्या समस्या शोधून दुरुस्ती करण्यावर भर देण्यात येणार आहे.

GIS द्वारे माहितीचे एकत्रीकरण : केंद्रिकृत प्लॅटफॉर्मवर रस्त्यांची स्थिती, दुरुस्ती आणि देखभाल इतिहासाचा रिअल-टाइम ट्रॅकिंग करण्यात येईल.

मान्सूननंतरची सर्वेक्षणे : अर्थसंकल्पाद्वारे खर्चाचे सुनियोजित वाटप करण्यासाठी वार्षिक तपासणी करण्यात येईल.

स्मार्ट गव्हर्नन्स : अनावश्यकता टाळण्यासाठी व जबाबदारी सुधारण्यासाठी महापालिकेच्या वर्क मॅनेजमेंट सिस्टीमशी रस्ता मालमत्ता व्यवस्थापन प्रणालीला जोडण्यात येणार आहे.

### ‘अशी’ आहे भौगोलिक माहिती प्रणाली!

» रस्ता मालमत्ता व्यवस्थापन प्रणाली (RAMS) या प्रकल्पाद्वारे ‘जीआयएस’द्वारे एक केंद्रिकृत व्यासपीठ तयार करून रस्ता देखभाल करण्यासाठी तंत्रज्ञान आधारित उपाय सुचविण्यात येतात. याद्वारे रस्ते व संबंधित पायाभूत सुविधांवर तपशीलवार सदैव रोजची वास्तविक माहिती देण्यात येते. या माहितीच्या आधारे वास्तविक रस्त्यांची परिस्थिती, रस्तादेखभालीसाठी घेतलेले पुढाकार व त्यांचा इतिहास व रस्ता मालमत्तेचे तपशील यामध्ये खांब, पथदिवे यांचा समावेश आहे. भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे माहिती संकलित करण्यासाठी व सध्याच्या परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी उच्च-रिझोल्यूशन कॅमेऱ्यांनी सुसज्ज जीपीएस – सक्षम वाहने तयार करण्यात आली आहेत. या प्रणालीमध्ये आधुनिक व प्रगत साधनांचा उपयोग करण्यात येत आहे.

# पीएमपी बसचालकांवर अंकुश ठेवणे गरजेचे

## पुण्याप्रमाणे पिंपरी-चिंचवडमध्ये कधी होणार कारवाई : वाहतूक नियमांच्या उल्लंघनाचे प्रमाण वाढले

**पुणे | प्रतिनिधी**

वाहतूक नियमांचे उल्लंघन, सिग्नल न पाळणे त्याचप्रमाणे प्रवाशांच्या देखील वेगवेगळ्या तक्रारी पीएमपीएमएलकडे प्राप्त होतात. याबाबत आता प्रशासनाने कारवाई करण्यास सुरुवात केली असून, पुणे शहरातील दोन चालकांवर कारवाई केली आहे. त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरात देखील अशा प्रकारची कारवाई व्हावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. अलीकडे बसचालकांकडून नियमांचे पालन होत नसल्याचे प्रकर्षाने स्पष्ट झाले आहे.



पीएमपीकडून पुणे आणि पिंपरी- चिंचवड भागात पीएमआरडीए कार्यक्षेत्रापर्यंत बससेवा पुरवली जात आहे. त्यामध्ये पीएमपी आणि ठेकेदारांच्या बसवरील चालक वाहतुकीच्या नियमांचे पालन करीत नसल्याबाबत प्रशासनाला वारंवार तक्रारी व सूचना प्राप्त होत आहेत. या तक्रारीमध्ये प्रामुख्याने बस चालवताना मोबाईलवर बोलणे, झेब्रा क्रॉसिंगवर बस थांबवणे, धूम्रपान करणे, मार्ग बोर्ड न बदलणे, लेनच्या शिस्तीचे पालन न करणे, सिग्नल तोडणे या तक्रारींचा समावेश आहे.

बस चालवताना मोबाईल फोनचा वापर करू नये, वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, धूम्रपान करू नये, बसेस रस्त्यात उभ्या न करता बस स्टॉपवर उभ्या कराव्यात, लेनच्या शिस्तीचे पालन करावे, भरधाव वेगाने बसेस चालवू नये, अशा विविध प्रकारच्या सूचना दिल्या असून त्याचे चालक आणि वाहक किती पालन करतात ते पाहावे लागेल. पिंपरी-चिंचवड शहरामध्ये तीन बस आगार आहेत. या ठिकाणी साडेपाचशे बस आहेत. शहरामध्ये धावताना चालकांकडून अनेक चुका होतात. त्याबाबत त्यांच्यावर कारवाई होण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेणे आवश्यक आहे.

### वेगावर हवे नियंत्रण

» पिंपरी-चिंचवड शहरातील चिंचवडगाव, पिंपरी, काळेवाडी, भोसरी, ताथवडे यासारख्या दाट लोकवस्तीमध्ये बसचालकांकडून नियम पाळले जात नाहीत. त्याचप्रमाणे वळण घेत असताना वेगावर नियंत्रण राखले जात नाही. परिणामी, छोटे मोठे अपघात देखील होत आहेत. यावर देखील कारवाई करण्याची अपेक्षा प्रवासी वर्गाने व्यक्त केली आहे.

“ नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी दोन चालकांवर नुकतीच कारवाई करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड शहरात देखील अशा प्रकारची कारवाई करण्याबाबत सूचना केल्या आहेत. नियमांचे पालन न केल्यास संबंधित चालक-वाहकांवर दंड आणि निलंबनाची कारवाई देखील होते.

**- सतीश गव्हाणे, मुख्य वाहतूक व्यवस्थापक, पीएमपीएमएल.**

# जिल्ह्यातील रस्ते, प्रकल्प लागणार मार्गी

## पीएमआरडीए आयुक्तांनी बोलावली अभियंता विभागाची बैठक : विकासकामांना मिळणार गती

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर रखडलेली, अडकलेली विकासकामे मार्गी लागणार आहेत. प्रामुख्याने रस्ते, उड्डाणपूल, प्रकल्प आणि त्याबाबतचे नियोजन सुरू झाले आहे. यासाठी पीएमआरडीए आयुक्तांनी अभियांत्रिकी विभागाची मंगळवारी बैठक बोलावली आहे. त्यामध्ये आचारसंहितादरम्यान अडकलेली कामे आणि इतर प्रकल्पांवरती चर्चा कोणत्या बाबत प्रत्यक्षात वर्क ऑर्डर निघू शकते. त्यामुळे आता विकास कामांचा मार्ग मोकळा होणार आहे.




राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा १५ ऑक्टोबरला केली होती. त्या दिवसापासून आचारसंहिता लागू झाली होती. दरम्यान त्या अगोदरच काही दिवस पीएमआरडीएचा अर्थसंकल्प मंजूर झाला होता. त्यामुळे निविदा प्रक्रिया तसेच अनेक प्रकल्पातील कागदपत्रातील कामे या आचारसंहितेमुळे अडकून पडली. दरम्यान नुकतीच २५ नोव्हेंबरला आचारसंहिता संपुष्टात आली. त्या अगोदर लोकसभा आचारसंहितेमुळे काही कामे होऊ शकली नाही. मात्र आता सर्वच निवडणुका पार पडल्यानंतर विकासकामे आणि अडकलेले प्रकल्प मार्गी लागणार आहेत.

पुणे, पिंपरी-चिंचवड या दोन्ही महापालिकेचा काही भाग आणि ८३२ गावांचा कारभार पीएमआरडीएच्या वतीने चालवण्यात येतो. यामुळे दळणवळणासाठी रस्ते, विविध प्रकल्प, उड्डाणपूल, रस्त्याची कामे या प्रकल्पांना खीळ बसली होती. या कामांना आलेल्या निविदा आहे त्या स्थितीत बंद करून ठेवण्यात आले होत्या. अनेक कामांना वर्क ऑर्डर दिली नसल्याने निविदा काढूनही पुढे काम सरकू शकली नव्हती. त्यामुळे गेल्या महिनाभरापासून कोणत्याही नवीन प्रकल्पावर अथवा रस्त्याच्या कामाबद्दल फाईल पुढे सरकली नव्हती. मात्र आता आचारसंहिता संपल्यानंतर डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यामध्येच बैठक घेण्यात येणार आहे. यावरती अभियांत्रिकी विभागातील प्रत्येक ठिकाणच्या अडकलेल्या कामाची माहिती, प्रकल्प आणि यापूर्वी प्राप्त झालेल्या निवेदनावरती चर्चा करण्यात येणार आहे.

### चार महिन्यांत किती कामे होणार?

» एप्रिलपासून नव्याने पुन्हा अंदाजपत्रक सादर करावा लागणार आहे. त्यामुळे आत्तापासून उरलेल्या चार महिन्यांमध्ये नेमका किती खर्च होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे अनेक कामासाठी टाकलेला निधी वाया जाण्याची शक्यता आहे तसेच, त्यापूर्वी काही प्रकल्प प्राधान्या.ने मार्गी लावण्याचे कसब पीएमआरडीएला करावे लागणार आहे. सप्टेंबरमध्ये ३ हजार ८३८ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली होती. मात्र, निवडणुकीच्या कामामुळे अनेक महिने वाया गेले. त्यामुळे आता उठलेल्या चार महिन्यांमध्ये नेमका किती खर्च केला जाणार आहे, याबाबत चाचणी सुरू आहे.

### 40 निविदांचा मार्ग होणार मोकळा

» जिल्ह्यातील विविध अंतर्गत रस्ते याचप्रमाणे काही प्रकल्पांच्या निविदांचा मार्ग मोकळा झाला आहे. यामध्ये प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रासाठी सल्लागार नेमणे, लोणावळा येथील टायगर पॉईंट आणि लायन्स पॉईंट इथे स्काय वाक प्रकल्प, मुळा नदीवरती पूल उभारणे यासारख्या महत्त्वाच्या विकास कामांना प्राधान्य राहणार आहे.

# अबब... शेवगा पोचला 600 रुपये किलोवर

## दक्षिणेत झालेल्या परतीच्या पावसाचा तडाखा पुण्यातील भाजीपाल्याला बसू लागला

**पुणे | प्रतिनिधी**

दक्षिणेत झालेल्या परतीच्या पावसाचा तडाखा पुण्यातील भाजीपाल्याला बसू लागला आहे. दक्षिणेतील शेवगा लागवडीला या पावसाचा फटका बसला आहे. त्यामुळे पुण्यासह राज्यात शेवग्याची आवक घटली आहे. त्यामुळे किरकोळ बाजारात शेवग्याचा भाव प्रचंड वधारला आहे. एक किलो शेवग्याला प्रतवारीनुसार ५०० ते ६०० रुपये किलोचा दर मोजावा लागत आहे.



राज्यातील मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुण्यासह मोठ्या शहरांमध्ये ही दरवाढ पहायला मिळते आहे. मागील अनेक वर्षात पहिल्यांदाच शेवग्याच्या दराची ही उच्चांक वाढ नोंदविण्यात आली आहे. बाजारपेठेतील तज्ञ व्यापाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शेवग्याची सर्वाधिक लागवड तमिळनाडू आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये होते. एरवी शेवग्याचा प्रतिकिलो दर हा १०० ते १२० रुपयांच्या आसपास असतो. मात्र, यंदा शेवग्याला दक्षिणेकडील परतीच्या पावसाचा फटका बसला.

शेवगा उष्ण असल्याने थंडीत या भाजीची मागणी वाढते. किरकोळ बाजारात पावशेर शेवग्याचा दर १२० ते १५० रुपये असल्याने ग्राहकांनी पाठ फिरविल्यामुळे मागणीही घटल्याचे काही व्यापारी सांगत आहेत.बाजारात १० किलोचा दर साधारण साडेतीन हजार ते चार हजार रुपयांपर्यंत पोचला आहे. नवी मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्येही शेवग्याची आवक घटल्याचे पहायला मिळाले. डिसेंबरअखेरीस आवक वाढल्यानंतर दरात घट होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तवली आहे.

भाज्यांमध्ये भेंडी ८० रुपये किलो, वांगी ८० रुपये किलो, बटाटा ५० ते ६० रुपये किलो, मेथी जुडी ३० रुपये, पालक जुडी ३० रुपये, तर कोथिंबीर जुडी २० ते ३० रुपये दराने विकली जात आहे. टोमॅटो देखील ५० ते ६० रुपये किलो दराने विकला जात आहे. व्यापारी विलास भुजबळ म्हणाले, सध्या भाज्यांची मागणी वाढली आहे. नव्या भाज्यांची आवक अजून मागणी प्रमाणे होत नसल्याने दर तेजीत आहे. पुढील १० ते १५ दिवसात नवा माल बाजारात दाखल होणार असून यानंतर भाज्यांचे दर नियंत्रणात येतील, अशी आशा आहे.